खटला दाखल तारीख :१८/०२/२०२६
खटला नोंदणी तारीख : १८/०२/२०२६
खटला निकाल तारीख : १६/०४/२०२६
**कालावधी** : ०० **वर्षे**, ०१ **महिने**, २९ **दिवस**

| | |
|---|---|
| MHTH250016932026 | **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.३, वसई, यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी– वाय. एस. काणे)**<br>**–न्यायनिर्णय–**<br>(घोषित दिनांक १६/०४/२०२६)<br>**नि.फौ.ख. क्र.८८१/२०२६, नि.क्र.८**<br>**गुन्हा क्र.२/२६ पोलीस ठाणे, बोळिंज** |
| फिर्यादी | शासन |
| अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. यु.एस.बेलेकर |
| आरोपी | **१. मंगेश् मधुकर पालंडे,**<br>वय– ४५ वर्षे, व्यवसाय– नोकरी,<br>रा. शामविहार, विराट नगर, विरार प. ता.वसई जि. पालघर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | निरंक |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०२/०१/२०२६ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १८/०२/२०२६ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २०/०२/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २०/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्तता. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मंगेश् मधुकर पालंडे** | ३५(३) प्रमाणे नोटीस वर सोडले. | निरंक | भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व १८५ प्रमाणे | निर्दोष मुक्तता केली. | निरंक | निरंक |

**।। न्या य नि र्ण य ।।**
**(पारित दिनांक १६ एप्रिल, २०२६)**

आरोपींविरुध्द भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व १८५ प्रमाणे अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाचे कलमाखालील दोषारोप पत्रानुसार खटला चालविण्यात आला आहे.

**२.** अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि. ०१/०१/२०२६ रोजी एस.के. बेकरी, स्टेशन रोड, विरार येथे सायंकाळी

८.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी ज्युपिटर दुचाकी क्र. एम.एच. ४८ डी.बी. ५३१३ ही घेवुन उभा असताना आरोपी यांनी त्यांच्या स्विफट डिझायर जिचा गाडी क्र. एम.एच. ०२ डी.एन. ५५५६ या वरील चालकाने म्हणजे आरोपीने सदरची गाडी भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन अपघात केला व फिर्यादी यांचे नुकसान केले. तसेच फिर्यादी यांना या अपघातामुळे मुक्कामार लागला. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. प्रथम खबरीच्या फिर्यादवरुन विरार पोलीस स्टेशनला अपराध क्र.२/२०२६ भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व १८५ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच संबंधीत साक्षीदारांचे जबाब नोंदवून सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

४. या न्यायालयाने आरोपींविरुध्द **नि.क्र. ३** नुसार भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व १८५ प्रमाणे दोषारोपपत्र ठेवले. आरोपीने यापैकी मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ प्रमाणे गुन्हा कबुल केला व इतर गुन्हे नाकबुल केले. त्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

५. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकच साक्षदार तपासला. आरोपी यांच्या विरुध्द कुठलाच पुरावा आला नाही म्हणुन त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–३१३ नूसार बयाण नोंदवायचे

नसल्याबाबत न्यायालयास नि.क्र. ७ खाली अर्ज करून कळविले.

६. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायायालयाच्या समक्ष न्यायनिर्णयाकरीता उपस्थित झाले. ते मुद्दे व निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, दि. ०१/०१/२०२६ रोजी एस.के. बेकरी, स्टेशन रोड, विरार येथे सायंकाळी ८.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी ज्युपिटर दुचाकी क्र. एम.एच. ४८ डी.बी. ५३१३ ही घेवुन उभा असताना आरोपी यांनी त्यांच्या स्विफट डिझायर जिचा गाडी क्र. एम.एच. ०२ डी.एन. ५५५६ या गाडीवरून आरोपीने भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन अपघात केला? | **नाही.** |
| २. अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे नुकसान केले? | **नाही.** |
| ३. अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला दुखापत पोहचवली? | **नाही.** |
| ४. अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, आरोपी हा दारू पिवुन गाडी चालवित होता? भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व १८५ | **होय.** |

५. आदेश काय ? **अंतिम आदेशा प्रमाणे.**

**।। का र ण मी मां सा ।।**

**७.** अभियोगपक्षाचे विद्वान वकील व बचावपक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद अभिलेखाप्रमाणे केला.

**मुद्या क्र.१ ते ४ करीता**

८. साक्षीदार क्र.१ राजशेखरन **(नि.क्र.३)** याने त्याच्या सरतपासात सांगितले की, याप्रकरणातील घटना दि. ०१/०१/२०२६ रोजी घडली. त्याला एका चार चाकी वाहनाने मागुन ठोकले व तो त्यावेळी एका दुचाकीवर होता. त्यांना कोणी तरी उचलुन संजीवनी दवाखान्यात नेले. त्यांना कोणी धडक दिली हे त्यांना आठवत नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कबूल केले की, नि.क्र. ४ प्रमाणे त्याचे व आरोपीचे आपसी झालेले आहे व त्याला ही केस पुढे चालवायची नाही.

९. सदरील प्रकरणात आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता सदरील प्रकरणात इतर कुठल्या कायद्याअंतर्गत आरोपीविरूद्ध सबळ पुरावा आलेला नाही. परंतु मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ प्रमाणे दारु पिवुन गाडी चालविल्या बाबत आरोपीने स्वतः कबुल केले आहे. त्याच प्रमाणे अभियोग पक्षाने **नि.क्र. ६** खाली स्वतः पुरावा बंद केला असल्याने मोटार वाहन

कायद्याच्या कलम १८५ व्यतिरिक्त या प्रकरणात इतर गुन्हे संशया पलीकडे सिध्द होणे शक्य नाही. भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे सिद्ध होण्यासाठी आवश्यक असलेले घटक अभिलेख पटलावर आलेले नाही. त्यामुळे आरोपीची भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे मधुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित वाटते. तसेच आरोपी याला मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अन्वये शिक्षेस जबाबदार धरण्यात येते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवून, मुद्दा क्र. ४ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व मुद्दा क्र.५ साठी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१. आरोपीची भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम–२७८ अन्वये कलम २८१, १२५(अ,ब) व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे, या गुन्हयांमधुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीची भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम–२७५ अन्वये मोटार वाहन कायद्याचे कलम १८५, या गुन्ह्यासाठी दोषी असल्याने त्याला १०,०००/– रूपये, इतका दंड ठोठविण्यात येतो.

३. आरोपी याने १०,०००/– रू. दंड न भरल्यास आरोपीने ६ महिन्याची शिक्षा भोगावी.

४. आरोपीने आपले बंधपत्र सुपुर्त करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

YASH SUDHIR KANE
Digitally signed by YASH SUDHIR KANE
Date: 2026.04.16 14:52:05 +0530

**(वाय. एस. काणे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.३) वसई,
ता. वसई, जि. ठाणे.

वसई.
दिनांक : १६/०४/२०२६

## भाग–क
## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | राजशेखरन नायर | फिर्यादी |

**ब. बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. निशाणी**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | नि. ४/ साक्षीदार क्र.१ | आपसी झाल्याबाबत पुरशीस |

YASH SUDHIR KANE
Digitally signed by YASH SUDHIR KANE
Date: 2026.04.16 14:52:13 +0530

**(वाय. एस. काणे)**

वसई.                न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिनांक : १६/०४/२०२६                (न्यायालय क्र.३) वसई,
ता. वसई, जि. ठाणे

# Certificate

I affirm that the contents of this PDF Judgment are same word to word, as per the original Judgment.

V.P.Patkari
Stenographer (Gr.3),